Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

## RESEARCH PAPER TITLE

# KOLHAPURATIL BHARTIYA ANDOLANATIL VANCHIT STRIYANCHYA YOGDANACHE – EK AKALAN VISHESH SAU JAYABAI HAVIRE & SAU BHAGIRATHIBAI TAMBAT

BY,



**Dr. G. N. Dhale**

Associate Professor

Department of History

Smt. G.K.G. Kanya Mahavidyalaya, Jayasingpur

# संशोधन पेपर

**विषय :—** कोल्हापूरातील भारतीय आंदोलनातील वंचित स्त्रीयांच्या योगदानाचे – एक आकलन
विशेष – सौ. जयाबाई हाविरे व सौ. भागिरथीबाई तांबट

डॉ जी. एन. ढाले, असोसिएट प्रोफेसर,
इतिहास विभाग प्रमुख



श्रीमती जी. के. जी. कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर
मो. नं. ९८८१८४९३२०, ७८२१८८९६७०

# कोल्हापूरातील भारतीय आंदोलनातील वंचित स्त्रीयांच्या योगदानाचे – एक आकलन
## विशेष – सौ. जयाबाई हाविरे व सौ. भागिरथीबाई तांबट

**प्रस्तावना –**

भारतीय इतिहासातील दृष्टीकोन विविध प्रवाहपैकी वंचितांचा इतिहास Sublatran Studies अंतानीग्रामसी यांची ही संकल्पना या दृष्टीने महिलांचे वंचितांच्या इतिहासामध्ये वंचित स्त्रियांचा अभ्यास हा एक स्त्रीवादी चळवळीचा महत्वाचा भाग आहे. भारतीय स्त्रीवादी चळवळीचा इतिहास हा वैदिक काळातील स्त्रीयांच्या बाबतीत वैदिक ग्रंथामध्ये स्त्री स्वातंत्र्याचा प्रातिनिधिक स्वरूपामध्ये पुरस्कार करणा–या महिलांचा संदर्भ पाहवयास मिळतो. गार्गी, मैत्री, अपाला, लोपमुद्रा इ. वरील विषयास अनुसरून आजच्या स्त्रीवादी चळवळीमध्ये वैदिक काळापासून ते उत्तर आधुनिक स्त्रीवादी चळवळीपर्यंत समिक्षात्मक पध्दतीने अभ्यास होणे आवश्यक आहे. या दरम्यान राजकीय, सामाजिक आणि अर्थिक यादृष्टीने महिलांच्या सबलीकरणामध्ये युरोपियन आणि आशियाई देशामध्ये स्त्रीवादी चळवळीचा परामर्श घेणे हे या संशोधन पध्दतीचे मुख्य उद्‌देश आहे. तसेच या महिला सबलीकरणास पुष्टी देणा–या विविध व्यत्कींच्या योगदानाची चर्चा यामध्ये महाराष्ट्र आणि भारतातील सर्व सुधारकांचे योगदान अतिशय मोलाचे आहे.

उपरोक्त संशोधन विषयास अनुसरून या संशोधन पध्दतीमध्ये पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हयातील स्त्रीवादी चळवळीमध्ये महत्वाची भुमिका ज्या महिलांनी घेतली त्यामध्ये सौ. भागिरथीबाई तांबट व सौ. जयाबाई हाविरे यांच्या कार्याचा चिकित्सक अभ्यास या संशोधन पध्दतीमध्ये करणेत आला आहे.

9 ऑगस्ट 1942 रोजी मं गांधी, कॉग्रेस कमिटी व प्रमुख नेत्यांना ब्रिटीश सरकारने गजाआड केल्यावर संपूर्ण भारतभर ब्रिटीश सरकार विरूध्द जनतेचा उद्रेक वाढू लागला. ब्रिटीश मुलुखातील बातम्या कोल्हापूरात जसजष्या येवू लागल्या तसतसा कोल्हापूरातील लोकांचा प्रक्षोभ वाढू लागला ठिकठिकाणी सरकार विरोधात सार्वजनिक सभा घेण्यात येवू लागल्या. ब्रिटीश साम्राज्याच्या विरोधी निदर्शने करण्यात येवू लागली. सर्वसामान्य जनतेवर लाठी हल्ला सुध्दा झाला, उघडपणे प्रक्षेभ व्यक्त करता येत नसल्यामुळे काही कॉग्रेस कार्यकर्ते प्रभात फे–या आयोजीत करून लोकमत जागृती करीत होते. उघडपणे आंदोलन करण्यास दरबारने पुर्णपणे बंदी घातलेली असल्यामुळे बरेच कॉग्रेस कार्यकर्ते संस्थानाबाहेर जाऊन स्वातंत्र्य आंदोलन करीत होते. थोर स्वातंत्र्य सेनानी सिध्दलिंग हाविरे यांच्या पत्नी सौ. जयाबाई हाविरे व भगिरथी तांबट यांनी स्वातंत्र्य लढयात भाग घेवून मोलाची कामगिरी केली. या दोघीनींही आपल्या लहान मुलासोबत तुरूंगवास भोगला होता. देशासाठी इतका पराकोटीचा त्याग करणारे तांबट व हाविरे

कुटुंब समाजातील महान आदर्श होते. कोल्हापूर स्वातंत्र्य लढयातील जयाबाई व भगिरथीबाई यांच्या कुटुंबियांनी सर्वसामान्य जनतेसमोर राष्ट्रभक्ती राष्ट्रवाद ख–या अर्थानं पोहचविला या दृष्टीने या दोघींचे कार्य अनुकरणीय आहे.

**सौ. जयाबाई हाविरे :–**

जयाबाई हाविरे यांचा जन्म 1919 च्या दरम्यान कोल्हापूर मध्येच झाला. संतराम बदगे यांच्या त्या कन्या होत्या. एका गरीब, दलित कुटुंबात त्यांचा जन्म झाला होता. वडिलांनी आपली मुलगी खूप शिकावी म्हणून षाळेत घातले चौथीपर्यंतचे त्यांचे शिक्षण झाले. पण काही वर्शातच वडिलांचे निधन झाले व जयाबाईंचे शिक्षण बंद झाले. याच काळात कोल्हापूरात स्वातंत्र्याच्या चळवळीलस धार आली होती. भाई माधवराव बागल यांचे बंधू वसंतराव बांगल, म. दू. श्रेश्टी, दत्तोबा तांबट आदी बरीच मंडळी या चळवळीत आघाडीवर होती. सिध्दल्गि हाविरे हे सुध्दा या चळवळीतील कार्यक्षम कार्यकर्ते ते वरीश्ट जातीत जन्माला आलेले. त्यांच्या लग्नाचा विशय निघाला तेव्हा त्यांना कोणीतरी जयाबाई बरोबर लग्न करण्याचे सुचविले. त्यांनतर महालक्ष्मी मंदिरात या दोघांचा धुमधडाक्यात विवाह झाला. क्षात्र जजगत्गुरू, भाई बागल, मातंग गुरूजी, गंगाराम कांबळे आदी बरीच मंडळी लग्नास उपस्थित होती. कोल्हापूरातील हा पहिलाच आंतरजातीय विवाह होता. सिध्दलिंग हाविरे हे 1930 च्या पूर्वी पासून स्वातंत्र्य चळवळीत होते. लग्नानंतर त्यांनी जयाबाई यांनाही चळवळीत भाग घेण्यास सांगितले. हाविरे पतीपत्नींनी म. गांधीजींचा आदेश व प्रचार याची पाठ शेवटपर्यंत सोडली नाही. शेवटपर्यंत खादीचे कपडे हा त्यांचा वेष होता. यादृष्टीने राष्ट्रपिता म. गांधी यांचे आचार, विचार सर्वसामानय जनतेपर्यंत पोहचविले.

**सौ. भागिरथीबाई तांबट :–**

यांचा जन्म पन्हाळा तालुक्यातील कोडोली गावी 1920 मध्ये झाला. घरची परिस्थिती गरीब असल्याने त्या काळी मुलींच्या शिक्षणाला आजच्या इतके महत्व नसल्याने शालेय शिक्षण चौथीपर्यंत झाले होते. 1935 मध्ये त्यांचा विवाह दत्तोबा तांबट यांच्याशी झाला. ते व्यवसायाने टेलरींगचे काम करीत होते. लग्नाआगोर आठच दिवस ते येरवडा तुरूंगातून झोंडा सत्याग्रहबद्दल शिक्षा भोगून आले होते. अशा माणसाबरोबर तू कसा काय संसार करणार ? तु आपली माहेरी जा असा अनाहुत सल्ला देणारे आप्तस्वकीय व शेजारी लोकही देत होते. त्यावेळी त्या माझे मी पाहते कसा संसार करायचा ते? असे त्या उत्तर देत असत. भगिरथीबाई तांबटानीच मग स्वातंत्र्य म्हणजे काय? चळवळ म्हण्जे काय, त्याचा उद्देश काय? हे समजावून सांगितले. 1942 च्या भारत छांडो आंदोलनामध्ये तांबट व त्यांचे सहकारी निवृत्ती आडूरकर यांनी चळवळीत सकिय सहभागाचा सल्ला दिला. आणि भागिरथीबाई तांबट चळवळीत सामील झाल्या होत्या. अशाप्रकारे या 1942 च्या चळवळीमध्ये स्त्रीाहभाग यादृष्टीने महिलांचे योगदान महत्वाचे ठरते.

9 ऑगस्ट 1942 रोजी आंदोलनाला सुरूवात झाली होती. त्यावेळी चळवळ अधिक उग्र बनली. भागिरथी बाई तांबट, दत्तोबा तांबट या स्वातंत्र्य योद्ध्यांची साथ मिळाल्यामुळे सौ. जयाबाई आणि सौ. भागिरथीबाई यांचा लढयातील सहभाग वाढवून इतर सर्वसामान्य स्त्रियांचा त्यांनी सहभाग वाढवला. राष्ट्रपिता म. गांधीच्या विचारांचा प्रभाव सर्वसामान्य जनतेपर्यंत एवढा पोहचविला जनता तुरूंगात जाण्यासही तयार झाली. इंग्रज सरकारविरूध्द तीव्र आंदोलन करण्यामध्ये व 9 ऑगस्ट 1942 ची चळवळ तीव्र करण्यामध्ये सौ. जयाबाई व सो. भगिरथीबाई यांनी केलेली कामगिरी उल्लेखनिय आहे.

या आंदोलनामध्ये भाई माधवराव बागल, दत्तोबा तांबट, सिध्दलिंग हाविरे, गायकवाड आडूरकर यांनी शहरामध्ये स्वातंत्र्य लढयाची एक रुपरेशा ठरवली त्यानुसार या सर्वांनी या चळवळीत सक्रीय सहभाग घेवून हे आंदोलन इंग्रज सरकार विरूध्द आंदोलन तीव्र बनविले.

या अखेरच्या स्वातंत्र्य लढयात महिलांचा सहभाग असावा असा विचार कोल्हापूरच्या नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी करून जयाबाई हाविरे व भागिरथीबाई तांबट यांना आव्हान केले. त्याचबरोबर याचा परिणाम दोघींच्या तुरूंगवासात होईल याचीही कल्पना त्यांना दिली. त्याप्रमाणे त्यांनी या कामगिरीचे आव्हान स्विकारून स्वातंत्र्य आंदोलनात सामील झाल्या होत्या. अशारितीने 1942च्या या क्रांती चळवळीत महिलांमध्ये स्वातंत्र्यबद्दल प्रबोधन व जागृती केली.4

### दारूबंदी चळवळीत सहभाग वाढवलाः

कोल्हापूरातील दारूच्या दुकानावर निदर्शन करण्यासाठी किसनताई शेटे, जयाबाई हाविरे, भागिरथीबाई तांबट यांनी भाग घेतला. त्यावेळी पोलिसांनी त्यांना पकडून नेले व तुम्ही गुन्हा केला नाही माफी मागा मग सोडतो असे गोडीगुलाबीने धाक दाखवून सांगून पाहिले. पण या तिघांनी ते जुमानले नाही व गुन्हाही कबूल केला आहे. पाण माफी मागणार नाही असे ठणकावून सांगितले होते. या स्वातंत्र्यवीरा दारूबंदीचा प्रचार निर्दशन करून करीत होत्या. अशारितीने हजारो कुटुंबे दारूच्या व्यसनापासून परावृत्त केले व स्वातंत्र्य आंदोलनासाठी त्यांना प्रोत्साहित केले.

### स्वातंत्र्यलढयातील भूमिगतांना सहकार्य व प्रोत्साहनः

सौ. जयाबाई व सौ. भागिरथीबाई यांचा लढयातील सहभाग वाढल्यानंतर त्या दोघी सिध्दाळयात असेल्या एका छापखान्यात ब्रिटीश सरकारविरूध्द छापलेली पत्रके घरोघरी वाटण्याचे काम करित असत आणि भूमिगत असलेल्या त्याच्या पतींना त्या माहिती पुरवत असत.

हि पत्रके कोर्टात, पोलिस ठाण्यात सरकारी कचेऱ्यात टाकली जात असत. इंग्रजी राजवट कशी जुलमी आहे, ते कसा त्रास देतात, स्वातंत्र्य कसे महत्वाच आहे. असा मजकूर त्या पत्रकात असायचा शिवाय लढयात भाग घेण्याचे आव्हान केले असायचे. इंग्रज सरकार विरूध्द भूमिगत वीरांना इंग्रजांच्या जमिनी व अन्यायाची माहिती पुरविली. इंग्रज सत्ता कषी वाईट वृत्तीने वागते या दृष्टीने इंग्रज सरकारला विरोध करण्यासाठी स्वातंत्र्यलढयातील भूमिगतांना सहकार्य व प्रोत्साहन दिले. 7

**इंग्रज सरकारच्या कोर्टाला बांगडयांचा आहेरः**

सौ. जयाबाई हाविरे व सौ. भागिरथीबाई तांबट यांना वेगवेगळया गुन्हासाठी कोर्टासमोर उभे केले असता पोलिसांनी माफी मागण्याविशयी सुचविले. परंतु त्यांनी माफी मागण्यास नकार दिला. त्यावेळी पेरी व साद्री या ब्रिटीश अधिका—याच्या समोर माफी मागण्यास नकार दिला. या दोघींनी कोर्टाचा अपमान केल्यामुळे त्यांना कोर्टासमोर उभे करण्यात आले. त्यावेळी शेटये नावांचे भारतीय गृहस्थ न्यायाधिश होते. भारतीय लोक इंग्रजाची सेवा करतात हे चुकीचे असून त्यांनी स्वातंत्र्य लढयात सहभागी व्हावे म्हणून त्यांनी कोर्टाला साडी चोळी आणि बांगडयाचा आहेर दिला व 'भारतमाता की जय' 'महात्मा गांधी की जय' अशा घोषणा दिल्या. सिटी मॅजेस्ट्रीटनी त्यांना ताकीद दिली. तुम्ही चांगल्या घरच्या स्त्रिया तुम्ही कशाला चळवळीत भाग घेता, याचा परिणाम तुमच्या पती प्रमाणे तुम्हालाही तुरूंगवास होईल याप्रमाणे याही वेळी त्यांना सोडून देण्यात आले होते. अशारितीने सौ. जयाबाई व सो. भगिरथीबाई तांबट तुरूंग व कोर्ट यांना न घाबरता भारतीय स्वातंत्र्यआंदोलनात सक्रीय सहभाग घेण्याचे अवाहन त्यांनी कोर्टासमोर केले. ८

**घोडयाच्या रेसला विरोध :—**

सर्वसामान्य जनतेने जुगार, रेस यावर पैसे उधळू नयेत या विषयाची पत्रके तांबट बाई, जयाबाई यांनी वाटलेली होती. तसेच रेसच्या बुकींग ऑफीस वर त्यांनी निदर्शने केली होती. या कामी त्यांना वसंतराव बागल व त्यांचे सहकारी यांनी त्यांना मदत केली होती. रेस व जुगार खेळणे यामुळे हजारो कुटुंबे उध्वस्त झाली होती. युवक व्यसनाधीन बनले होते. यादृष्टीने वरील दोघींनी या घोडयाच्या रेसविरूध्द जनजागृती केली. ९

**डांबर प्रकरण एक वास्तव :—**

कोल्हापूरातील मध्य चौकात मुंबईचे माजी गव्हर्नर सर वेलस्ली विल्सन यांच्या पुतळयाचे उद्घाटन भारताचे तत्कालीन इंग्रज व्हईसरॉय लॉर्ड आयर्विन यांनी दि. 19/11/1929 रोजी केले होते. 15 ते 20 फुट उंच असलेला तो संगमरवरी पुतळा विद्रुप करण्याचा निर्णय स्वातंत्र्य सैनिकांनी घेतला. निवृत्ती आडूरकर व गजानन भुसारी यांनी या कामाचा विडा उचलला. स्वातंत्र्य सैनिक सिध्दलिंग हाविरे यांच्या पत्नी सौ. जयाबाई व स्वातंत्र्यशाहीर दत्तोबा तांबट यांच्या पत्नी सौ. भागिरथी बाई यांची या कार्यासाठी निवड केली. ही निवड दोघींनी सार्थ करून दाखविली.10

घटस्थापनेच्या आदल्या रात्री निवृत्ती आडूरकर हे कार्यकर्ते भागिरथीबाई तांबट यांच्या घरी आले. एका वेताच्या करंडीत 10—12 लोटकी पांढ-या फडक्याने घट्ट बांधलेली होती. ती

करंडी भागिरथीबाईंकडे सोपवून म्हणाले, ‘उद्या दुपारी 12 वाजता मंडईतील चौकात जा, अन गर्व्हनर विल्सनच्या पुतळयावर ही लोटकी भिरकावून द्या. एकीकडून तुम्ही या व दुसरी कडून जयाबाई हाविरे येतील.’ जयाबाईंनांही अशाच सूचना दिलेल्या होत्या. या दृष्टीने डांबर प्रकरणात सौ. जयाबाई हाविरे व भगिरथी तांबट यांनी केलेली कामगिरी विचार करायला लावते. 11

घटस्थापनेच्या त्या दिवशी दुपारी लोकांना या प्रकारची कुण कुण असल्याने ते आपआपल्या दुकानाची एक फळी उघडून चोरून ही कृती पाहण्यासाठी उत्सुक होते. ठरल्याप्रमाणे दुपारी 12 वा. भागिरथीबाई टांग्यातून पुतळयाजवळ पोहचल्या अन खाली उतरून मडक्यांली बांधलेली तोंड हातात धरून ती भरभर पुतळयाच्या पुढील बाजूस वरून खाली अशी भिरकावली. त्याचवेळी जयाबाई ही दुसऱ्या टांग्यातून आल्या. अन त्यांनी खाली उतरून पुतळयाच्या मागील बाजूस वरून खालीपर्यंत ती मडकी भिरकावून दिली. त्या क्षणी मडकी फुटून त्यातील ॲसीड मिश्रीत डोबर पुतळयावर पडून त्यातील ॲसीडमुळे पुतळा विद्रुप होवून त्यातून धूर निधू लागला, सर्व मडकी भिरकावल्यावर दोघींनी ‘भारत माता की जय’, ’ महात्मा गांधी की जय’ अशा घोशणा दिल्या. टांगेवाला भीतीने पळून गेला. त्या दिवशी दोघीजणी आपापल्या घरी गेल्या. अशारितीने सौ. जयाबाई हाविरे व सौ. भगिरथीबाई तांबट यांचे डांबर प्रकरणातील योगदान सर्वश्रेष्ठ आहे.

तुरूंगवासास तयार :

विल्सनच्या पुतळयाला डांबर फासल्याने इंग्रज अधिकारी खवळले होते. पोलिस दोघीना पकडण्यासाठी फिरू लागले. याच दिवशी सिध्दलिंब हाविरेंना अटक झाली त्याचवेळी जयाबाईंना पोलिस अटक करण्यास आले. तेव्हा त्या पोलिसांना म्हणाल्या वॉरंट आहे का तुमच्याकडे? वॉरंट आणा मगच कचेरीत येते. शिपाई गेल्यांनतर शाहूपुरी पोलिस ठाएयाचे फौजदार आले. त्यांच्याकडे जयसाबाईच्या अटकेचे वॉरंट होते. दोन्ही मुलांना बरांबर घ्या. त्यांना पांघरायला काहीतरी घ्या असे त्यांनी सांगितले. ती संबंध रात्र त्यांनी पोलिस ठाण्यात घालविली. दोघाही पालिसांना न घाबरता पोलिसांना त्यांनी व्यवस्थित उत्तरे दिली. 13

इकडे भागिरथीबाई तांबट यांच्या ही घरी पोलिस गेले त्यावेळी त्या म्हणाल्या रात्री मी पोलिस गेटावर मुळीच येणार नाही. तुम्ही उद्या सकाळी या । असे म्हटल्यावर पोलीस त्यांच्या दारात पहाऱ्याला बसलेले होते. सकाळी आंघोळ वैगेरे आटून त्यांनी आपल्या मुलाला माळकरांच्या माईकडे सोपविले व पोलिसंच्या स्वाधीन झाल्या. भागिरथीबाई व जयाबाई यांना तीन दिवस करवीर लॉकअप मध्ये ठेवण्यसात आले. त्यानंतर लागलीच खटला सुरू झाला. न्यायाधीश चिपरीकर यांच्या त्यांना उभे करण्यात आले. आधी दोघीना समजावून सांगीतले. तुम्हाला लहान मुले आहेत, तुम्ही गरोदर आहात, तुरूंगाम तुमचे हाल होतीलच, पण मुलांचीही आबाळ होईल. ुम्ही गुन्हा कबूल करून माफी मागा आम्ही तुम्हाला सोडून देतो. पण या दोघींनीही नकार दिला. महिनाभर केस चालून दोघींना 15 महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा झाली. प्रत्यक्षात ही शिक्षा आठ महिने भोगली. शिक्षेचा कालावधी 20–12–1942 ते

30–06–1943 असा होता. या दोघींनीही लहान मुलासह शिक्षा भोगली. त्याच दरम्यान भागिरथीबाई गरोदर असल्याने बाळंतपणासाठी पोलीस बंदोबस्तात त्यांना सरकरी दवाखान्यात नेले व 2–4 दिवसानंतर पुन्हा तान्ह्या मुलासह त्या तुरूंगात दाखील झाल्या. कुपोषणामुळे ते तान्हे मुल पुढे दगावले. 14 सौ. भागिरथीबाई तांबट (इल्ली सेंट्रल जेलमध्ये शिक्षा भोगीत असलेल्या) येथील अर्ल्बर्ट हॉस्पिटल मध्ये प्रसूत होवून त्यांना मुलगा झाल्याचे कळते. राजबंदी स्त्री येथील जेलमध्य प्रसूत होण्याचे हे पहिलेच उदाहरण असून त्यांची प्रकृती उत्तम असल्याचे कळते पुढारीने हे निवेदन प्रसिध्द केले आणि घरच्यांना युध्द कैद्यांची खुशाली वरचेवर कळू लागली होती. अशा रितीने सौ. जयाबाई व सौ. भगिरथीबाई यांनी राष्ट्रपिता म. गांधींच्या विचाराचा आदर्श करित असताना कुटुंबाकडे लक्ष दिले नाही मुलांकडे लक्ष दिले नाही. स्वातंत्र्य आणि म. गांधी यांचाच विचार केला.

## एकाकी अखेरची झुंज

गव्हर्नर विल्सनच्या पुतळयावर डांबर फासल्याच्या प्रकरणात जयाबाई हाविरे व भागिरथीबाई या दोघींना शिक्षा झाली. जयाबाई समवेत दोन वर्षाचा व आठ महिन्याची मुलगी होती. भागिरथीबाई तांबट यांच्याबरोबर त्यांचा मुलगा व त्या गरोदर होत्या. आई वडिलांच्या बरोबर लहान मुलांनाही तुरूंगात रहावे लागले होते. आपला प्रपंच चालविण्यासाठी दोघींनाही एकाकीपणे घुजावे लागले होते.16

तुरूंगातून सुटका झाल्यावर भागिरथीबाई तांबट यांच्या घरमालकाने सरकारचा रोश नको म्हणून ठेवून घेण्यास नकार दिला. पण त्यांना खुप विनंती केल्यानंतर त्यांनी एक वर्शाचे आगाऊ भाडे व स्वतःच्या जबाबदारीवर राहण्याच्या अटीवर घर देण्याचे कबूल केले. पती तुरूंगंत असलेने तीन मुले यांचा चरितार्थ चालविण्यासाठी त्यांनी खुप कष्ट घेतले. सोन्याचे मणी लाखेने भरण्याचे काम करून त्यांनी आपली मुले व कुटुंब यांचा चरितार्थ भागवला पण त्या डगमगल्या नाहीत.

सारांश :

अशा प्रकारे 9 ऑगस्ट 1942 च्या स्वातंत्र्य लढयामध्ये आपल्यसा पतींच्या बरोबर मोठया हिरीरीने भाग घेणाऱ्या स्वातंत्र्य विरांगणा सौ. भागिरथीबाई तांबट व सौ. जयाबाई हाविरे यांचा उल्लेख करावा लागेल. ज्या काळात स्त्रिया घराच्या बाहेर पडत नसत व पुरूष स्वातंत्र्य लढयात उतरायला कचरत होते. त्या काळात मोठया धैर्याने घराबाहेर पडून स्वातंत्र्य चळवळ हा आपला संसार मानणाऱ्या ह्या लढवय्या होत्या. उमेदीची अनेक वर्षे आपल्या पतीच्या बरोबर स्वातंत्र्य चळवळीत घालविलेल्या, लाठीमार खाल्लेल्या, तुरूंगवास भोगलेल्या या महिलांचे कार्य नव्या पिढीला विसरून चालणार नाही . देशाला स्वातंत्र्य लढयातील त्यांची धाडसी वृत्ती ही नव्या पिढीपुढे प्रेरणास्थान बनली पाहिज. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याबरोबर देशाबद्दल असलेली जाज्वल्य राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम युवक, तरूण पिढीमध्ये निर्माण झाली पाहिजे. या कोल्हापूरातील या शूर महिलांनी आपले आयुष्य निस्वार्थीपणे देशसेवेत घालविले. त्याप्रमाणे

आजच्या युवक युवतीने यांनी या वीर महिलांचा आदर्श घेणे जरूरीचे बनले आहे. सौ. भागिरथीबाई तांबट व सौ. जयाबाई हाविरे यांच्या देशभक्तीच्या अफाट कार्याबद्दल राज्यशासनाने या दोघींना ताम्रपट देवून गौरव केला. अशा या महान स्वातंत्र्य आंदोलनातील कर्तृत्ववान स्त्रियांना आमचा सलाम! वंचितांच्या इतिहासामध्ये सौ. जयाबाई हाविरे व सौ. भगिरथीबाई तांबट यांनी केलेले योगदान आपल्या देशातील युवक युवतींना कधीही विसरता येणार नाही.

संदर्भ :—

1. दै. पुढारी, 11 जानेवारी 2002, पृ. 5
2. दै. सकाळ, 22 ऑक्टोबर 1988, पृ. 3.
3. दै. तरूण भारत, 1 जानेवारी 2001, पृ. 2.
4. दै. पुढारी, 19 जानेवारी 2001, पृ. 5
5. दै. पुढारी, उपरोक्त, पृ. 5
6. दै. तरूण भारत, उपरोक्त, पृ. 2.
7. दै. सकाळ, उपरोक्त, पृ. 3.
8. दै. पुढारी, 4 फेब्रुवारी 2002, पृ. 5
9. कित्ता, पृ. 5.
10. दै. तरूण भारत, 13 ऑगस्ट 1997, पृ. 5
11. तांबट प्रभाकर, क्रांतीच्या ज्वाळा, मधुश्री प्रकाशन, पुणे, 2010, पृ. 75,76
12. दै. पुढारी, 11 जानेवारी 2002, पृ. 5
13. दै. पुढारी, 4 फेब्रुवारी 2002, पृ. 5
14. तांबट प्रभाकर, उपरोक्त, पृ. 76
15. दै. पुढारी, 3 जानेवारी 1943, पृ. 7
16. दै. तरूण भारत, 9 डिसेंबर 1997, पृ.5
17. दै. क्रांतिसिंह, 9 ऑगस्ट 1990, पृ.12.